नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १८/०९/२०२६ ( शुक्रवार )

---

## पोलीस स्टेशन रामटेक येथील पोलीस अधिकारी असल्याचे बतावणी करून फसवणूक करणाऱ्या आरोपीस आष्टी येथून घेतले ताब्यात
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन रामटेक** :– मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री अंकुश माने, प्रभारी अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण यांच्या नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पोलीस स्टेशन रामटेक येथील पोलिस अधिकारी असल्याचे बतावणी करून एका व्यक्तीस फोनद्वारे धमकी देत आर्थिक फसवणूक करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला निष्पन्न करून अटक केले आहे.

पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत दिनांक १४/०९/२०२६ रोजी फिर्यादी अमोल हंसराज खंते, वय ४९ वर्ष, रा. कॅम चेरी फार्म ॲडव्हेंचर पार्क रामटेक, ता. रामटेक, जि. नागपूर यांनी तक्रार दिली की, दिनांक १४/०९/२०२६ रोजी फिर्यादी हे चेरी फार्म येथे उपस्थित असताना त्यांच्या मोबाईल क्रमांकावरएका अनोळखी व्यक्तीचा फोन आला. सदर व्यक्तीने स्वत:ची ओळख नागपूर येथील एसपी कार्यालयातील पोलीस उपनिरीक्षक राठोड अशी सांगुन तसेच फिर्यादी व त्यांच्या फार्मच्या मालकाविरुद्ध तक्रार असल्याचे सांगून विविध प्रकारची भीती दाखवली. सदर व्यक्तीने फोनवरून धमकी स्वरूपात बोलून गुन्हा दाखल करण्याची व मालमत्ता सील करण्याची कारवाई करण्याबाबत सांगितले. अशा फिर्यादीचे रीपोर्ट वरून सदर प्रकरणी पोलीस स्टेशन रामटेक येथे अप. क्र. ८६३/२६ कलम २०४, ३५१(४), ३१९(२) भा. न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद आहे.

पोलीस ठाणे रामटेक येथे दाखल असलेल्या गुन्ह्याचा समांतर तपास करून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे सदर गुन्ह्यातील आरोपी चंदन दिघुराम सांगरे, वय ३१ वर्ष, राह. आष्टी, जिल्हा गडचिरोली याला निष्पन्न केले व त्याचा कसोशीने शोध घेऊन दिनांक १७/०९/२०२६ रोजी आष्टी

येथून ताब्यात घेतले. त्याच्याकडे कौशल्यपुर्व तपास केला असता नमुद आरोपीने पोलीस स्टेशन रामटेक परिसरात सदर गुन्हा केल्याची कबुली दिली. तपासादरम्यान मिळालेल्या माहितीनुसार आरोपीविरूद्ध महाराष्ट्रातील विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीत गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर आरोपीविरुद्ध कर्जत, अहिल्यानगर, वरोरा, गोंदिया, देवरी तसेच पोलीस स्टेशन यशोधरानगर, नागपूर शहर या ठिकाणी सन २०२१ पासून विविध स्वरूपाचे गुन्हे दाखल असल्याची माहिती प्राप्त झाली.

## अस्तित्व लपवुन गुन्हा करण्याच्या उद्देशाने फिरणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद (०२ आरोपींविरूद्ध ०२ गुन्हे नोंद)

**पोलीस स्टेशन बुट्टीबोरी :–** दिनांक १७/०९/२०२६ रोजी बुट्टीबोरी पोलीस अवैध धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोलींग करीत असता स्वत:चे अस्तित्व लपवुन सुर्यास्तानंतर आणि सुर्योदयाच्या पुर्वी संशयास्पदरीत्या फिरणाऱ्या दोन इसमविरूद्ध बुट्टीबोरी पोलीसांनी कारवाई केली.

आरोपी नामे १) सावन उमाजी सराटे, वय २७ वर्ष, रा. वर्धा रोड नवरमारी ता. जि. नागपुर तसेच आरोपी क्र. २) मनोज पुरूशोत्तम येसनसुरे, वय २२ वर्ष, रा. वर्धा रोड नवरमारी ता जि. नागपूर हे पोलीस स्टेशन बुट्टीबोरी हद्दीत दोन वेगवेगळया घटनास्थळावर स्वत:चे अस्तित्व लपवुन सुर्यास्तानंतर आणि सुर्योदयाच्या पुर्वी संशयास्पदरीत्या फिरतांना मिळुन आले. सदर इसमांना त्यांचे नाव व गाव विचारले असता त्यांनी उडवा उडवीचे उत्तरे दिली. नमुद आरोपी हे दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने वावरतांना मिळुन आल्याने दोन्ही आरोपीचे विरूद्ध कलम १२२ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये ०२ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

## पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत खुनाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीस अटक कन्हान पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कन्हान :–** दिनांक १७/०९/२०२६ रोजी फिर्यादी सौ. साधना जागेश्वर नायक, वय ४५ वर्ष, रा. दत्त नगर कामठी, कॉलरी नं ०३, ता. पारशिवनी यांनी पोलीस स्टेशन कन्हान येथे तक्रार दिली की, दिनांक १७/०९/२०२६ रोजी फिर्यादी व आरोपी नामे विरेन्द्र कल्लु नायक, वय ४० वर्ष, रा. दत्त नगर कामठी, कॉलनी नं ०३ हे एकमेकांचे नातेवाईक असून एकमेकांचे घराशेजारी राहतात. आरोपी हा फिर्यादीचे घराशेजारी जावून आपले

पत्नीचे नावाने शिवीगाळ देत असता फिर्यादी यांनी हटकले असता आरोपीने फिर्यादीस तुच माझ्या पत्नीला बिगडविले असे बोलून फिर्यादीला शिवीगाळ करून झगडा भांडण केले व दोन्ही हाताने तिचा गळा दाबुन जिवानीशी ठार मारण्याचा प्रयत्न केला.

**पोलीसांनी सदर प्रकरणात कलम १०९(१), ३५१(२), ३५२ भान्यासं अन्वये गुन्हा नोंद करून आरोपीला दिनांक १८/०९/२०२६ रोजी अटक करण्यात आली आहे.**

## अवैध दारू निर्मिती, विक्री आणि सेवन करणाऱ्यांवर ११ गुन्हे दाखल, १,२५,५१०/—रूपयाचा मुद्देमाल जप्त

**दिनांक १७/०९/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध दारूची निर्मिती, विक्री, साठवणूक, वाहतूक तसेच दारूचे सेवन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध प्रभावी कारवाई करून दारूबंदी कायद्यान्वये एकूण ११ गुन्हे दाखल केले.**

**पोलीस स्टेशन मौदा** येथे आरोपी नामे १) चक्रधर बबन धामने, वय ३८ वर्ष, रा. चिरव्हा, ता. मौदा २) मुन्नालाल भैरूयाजी साठवने, वय ४५ वर्ष, रा. तेली मांगली, ता. मौदा यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन सावनेर** येथे आरोपी नामे १) मोरेश्वर माधोराव बरवड, वय ४५ वर्ष, दोन्ही रा. वार्ड क्र २, धापेवाडा, ता. सावनेर २) महिला आरोपी यांचेवर ०१ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन खापा** अंतर्गत आरोपी नामे १) अनिल शेरसिंग दर्शन, वय ३४ वर्ष, २) रमेश शिलू, दोन्ही रा. चैरेपठार, ता. बिचवा, जि. छिंदवाडा म.प्र. यांचेवर ०१ गुन्हा नोंद, तसेच **१)** रावजी मोहन परतेती, वय ४५ वर्ष, रा. सिंदेवानी, ता. सावनेर, जि. नागपुर २) निलेश ओमप्रकाश कोसरे, वय ३२ वर्ष, रा. सिंदेवानी, ता. सावनेर, जि. नागपुर ३) रमेश मारोती किरणाके, वय ४७ वर्ष, रा. सवरनी, ता. सौसर, जि. पांढुर्णा म. प्र. यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०३ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन बोरी अंतर्गत** आरोपी नामे गोपीनाथ रघुनाथ महाजन, वय २७ वर्षे, रा. धवळपेठ, ता. जि. नागपूर याचेवर ०१ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन काटोल अंतर्गत** आरोपी १) उमेश रमेश बलांशे, रा. अर्जुननगर काटोल, जि. नागपुर २) प्रविन नामदेवराव गायधने, रा. मसोरा, ता. नरखेड, जि. नागपुर यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद. **पोलीस स्टेशन पारशिवनी अंतर्गत** आरोपी निरंजन हरि निकोसे, वय ५९ वर्ष, रा. डोरली, ता. पारशिवनी, जि. नागपूर याचेवर ०१ गुन्हा नोंद.

नमुद कारवाईत एकुण १३४१० मिली देशी दारू, ३५ लिटर मोहाफुल दारू, ८० लिटर मोहाफुल सडवा, ०१ मोसा व इतर साहित्य असा एकुण १,२५,५१०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.

## अवैध जुगार खेळणाऱ्या ०५ आरोपींवर गुन्हे दाखल
## ३१५०/— रूपयाचा मुद्देमाल जप्त

**मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली नागपूर ग्रामीण जिल्ह्यात अवैधरित्या जुगार खेळणाऱ्या तसेच जुगार खेळविणाऱ्या व्यक्तींविरुद्ध कठोर कारवाई करून पोलीस स्टेशन बेला, खापा हद्दीत अवैधरित्या जुगार खेळणाऱ्या ०५ आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकूण ०२ गुन्हे दाखल करण्यात आले.**

**पोलीस स्टेशन बेला** येथे आरोपी नामे तुषार विजय हेडावु, वय २२ वर्ष, रा. पिपरा, ता. उमरेड, जि. नागपुर हा अवैधरित्या सट्टापट्टीचा जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्याचे वर **०१ गुन्हा नोंद** करण्यात आला आहे. **पोलीस स्टेशन खापा** येथे आरोपी नामे १) अशोक देवराव चोर, वय ६४ वर्ष, २) संजय उर्फ सोनु कृष्णाजी राउत, वय ३६ वर्ष, ३) प्रकाश नामदेव राउत, वय ४६ वर्ष, सर्व रा. कोदेगाव ४) जितेंद्र प्रल्हाद जरवेकर, वय २४ वर्ष, रा. खापा हे अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळतांना मिळुन आल्याने त्यांचे वर **१ गुन्हा नोंद** आहे.

**वर प्रमाणे ०५ आरोपीविरूध्द महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकुण ०२ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. ५२ ताशपत्ते व सट्टापट्टी साहित्य, नगदी एकुण ३१५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

जनसंपर्क अधिकारी
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर